[illegible]

CODE : SCS [illegible]

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO.

# प्रश्नपुस्तिका

## सामान्य अध्ययन व बुद्धिमापन चाचणी

एकूण प्रश्न : 100

वेळ : 1 (एक) तास

एकूण गुण : 100

### सूचना

1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनात **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी, **ह्याकरिता फक्त निळ्या वा काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात येईल. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण ***एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.*** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. त्या प्राप्त गुणांतून त्यांनी उत्तरपत्रिकेत चुकीची उत्तरे नमूद केल्याबद्दल गुण वजा केले जाणार नाहीत.**

8) ------------------------------------------------------------------------> ( कृपया पान उलटवा )

### ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम -82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एका वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

Truexams.com

Truexams.com

8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त–उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एका वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपली उत्तरपत्रिका समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.

10) प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रश्नांमध्ये काही दोष आढळल्यास, त्यासंबंधी उमेदवाराने अधिप्रमाणित (Authentic) स्पष्टीकरण/संदर्भ देऊन आपले लेखी निवेदन आयोगाच्या परीक्षा नियंत्रकांकडेच स्वत:च्या तपशीलासह टपालाने पाठवावे. याबाबत पर्यवेक्षक/समवेक्षक इत्यादींकडे विचारणा करू नये.आयोगाकडे सदर परीक्षेच्या दिनांकापासून 8 दिवसांपर्यंत पोहोचलेल्या लेखी निवेदनाची फक्त दखल घेतली जाते. तद्नंतर आलेली निवेदने विचारात घेतली जात नाहीत. तसेच प्राप्त झालेल्या निवेदनाबद्दल कोणताही पत्रव्यवहार केला जात नाही.

---

## नमुना प्रश्न

प्र.क्रं. 201. "सतीची चाल नष्ट करण्यासाठी मुलत: कोणी प्रयत्न केले ?

(1) स्वामी दयानंद सरस्वती  (2) ईश्वरचंद्र विद्यासागर

(3) राजा राम मोहन रॉय  (4) गोपाळ कृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) राजा राम मोहन रॉय' असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्र. क्र. 201 समोरील उत्तर क्रमांक "[3]" हा कंस पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. 201. [1] [2] ■ [4]

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित कंस पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **हयाकरिता फक्त निळ्या वा काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे. पेन्सिल वा शाईचे पैन वापरू नये.**

---

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे पृष्ठ उलटू नये**

---

Truexams.com

कच्च्या कामासाठी जागा
SPACE FOR ROUGH WORK

Truexams.com

# सामान्य अध्ययन आणि बुद्धिमापन चाचणी
# GENERAL STUDIES AND INTELLIGENCE TEST

1. कागद पाण्यावर तरंगतो कारण
   (1) कागद घनरूप असून पाणी द्रवरूप आहे
   (2) घन पदार्थ द्रवापेक्षा हलके असतात
   (3) कागदाची घनता पाण्यापेक्षा कमी आहे
   (4) कागद पाण्यत विरघळत नाही

   Paper floats on water because
   (1) Paper is solid and water is in liquid state
   (2) Solids are lighter than liquids
   (3) Density of paper is less than that of water
   (4) Paper does not dissolve in water

---

2. 'कोणत्याही पुस्तकास पंख नसतात.' असे विधान केले तर त्यावरून कोणता निष्कर्ष काढता येईल ?
   (1) सर्व पुस्तके पंखाशिवाय असतात (2) ज्याला पंख असतील ते पुस्तक नसते
   (3) पुस्तकाला पंख असणे आवश्यक आहे (4) कांही पुस्तके विना पंखाची असतात

   If the statement is 'no book has wings', then what can be concluded?
   (1) All books are without wings (2) Anything with wings is not a book
   (3) A book must have wings (4) Some books are without wings

---

3. पाच पोलिस शिपाई जे १०१, १०५, १०८, २०५, २०८ या संख्यांनी ओळखले जातात एका रांगेत उभे आहेत. २०५ हा १०८ च्या डाव्या बाजूस; १०५ हा २०८ च्या डाव्या बाजूस ; १०१ हा १०८ च्या उजव्या बाजूस आणि १०१ हा १०५ च्या डाव्या बाजूस उभा आहे.
   तर मध्यभागी खालीलपैकी कोण उभा असेल ?
   (1) २०८ (2) १०५
   (3) १०८ (4) १०१

   Five policemen represented by numbers 101, 105, 108, 205, 208 are standing in a queue. 205 is to the left of 108 ; 105 is to the left of 208 ; 101 is to the right of 108 ; 101 is to the left of 105. Who is standing in the middle ?
   (1) 208 (2) 105
   (3) 108 (4) 101

---

4. काल माझे वडिल मला म्हणाले "परवा शुक्रवारी माझा मित्र डेक्कन क्वीन ने येणार आहे." तर आज कोणता दिवस आहे ?
   (1) बुधवार (2) शुक्रवार
   (3) गुरुवार (4) शनिवार

   Yesterday my father said to me, " Day after tomorrow, on Friday my friend will arrive by the Deccan Queen." What is the day today ?
   (1) Wednesday (2) Friday
   (3) Thursday (4) Saturday

---

5. जर पाण्याला लोणी म्हटले, लोण्याला साबण म्हटले, साबणाला शाई म्हटले, शाईला पेन म्हटले आणि पेनला पाणी म्हटले तर कपडे धुण्यासाठी खालीलपैकी काय वापरायला पाहिजे ?

(1) पाणी व पेन (2) लोणी व साबण

(3) शाई व लोणी (4) पेन व लोणी

If water is called butter , butter is called soap, soap is called ink, ink is called pen and pen is called water. Then which of the following should be used for washing clothes ?

(1) Water and pen (2) Butter and soap

(3) Ink and butter (4) Pen and butter

---

6. एका बस स्थानकावरून गोव्याला जाणारी बस प्रत्येक २५ मिनिटानंतर सुटते. एका प्रावाशाने चौकशी खिडकी मध्ये चौकशी केली असता १० मिनिटांपूर्वीच एक बस गेली आणि पुढील बस सकाळी १० वाजून २० मिनिटांनी आहे असे क्लर्कने सांगीतले. ज्या वेळी ही माहिती क्लर्कने दिली त्यावेळी किती वाजले होते ?

(1) १०.१० मि. (2) ९.२५ मि.

(3) १०.०५ मि. (4) ९.४५ मि.


A bus for Goa leaves every 25 minutes from a bus stand. After enquiry, the passenger was informed by the clerk that a bus has already left before 10 minutes and the next bus will leave at 10.20 a. m. At what time did the enquiry clerk give this information to the passenger ?

(1) 10.10 a.m. (2) 9.25 a.m.

(3) 10.05 a.m. (4) 9.45 a.m.

---


7. रिकाम्या त्रिकोणात कोणती संख्या येईल ?




(1) ४३ (2) ३३

(3) ३९ (4) ३१

Find out the missing figure (?) in the triangle :




(1) 43 (2) 33

(3) 39 (4) 31

---

8. खांबा आणि लिंबा या दोन शहरांमधील अंतर १२० किमी आहे. दोन शहरास जोडणाऱ्या रोडवर प्रत्येक ६ कि.मी. अंतरावर पोलिस स्टेशन्स आहेत. तर दोन शहरांदरम्यान असणाऱ्या पोलिस स्टेशन्सची संख्या किती राहील ?

(1) १९ (2) २०

(3) २१ (4) २२

Distance between two cities namely Khamba and Limba is 120 kms. At every 6 kms, there is a police station along the road which connects these cities. How many police stations are there between these two cities ?

(1) 19 (2) 20

(3) 21 (4) 22

Truexams.com

9. खालील चारांपैकी तीन मध्ये कांही विशिष्ट साम्य आहे. म्हणून त्यांचा एक गट तयार होतो. त्या गटात न मोडणारी बाब कोणती.

दिवस, मिनीट, तारीख, तास

(1) दिवस (2) मिनीट

(3) तारीख (4) तास

Three of the following four are alike in a certain way and so form a group. Which is the one that does not belong to the group.

Day, Minute, Date, Hour

(1) Day (2) Minute

(3) Date (4) Hour

---

10. खालील मालिकेतील गाळलेला अंक दिलेल्या पर्यायांमधून शोधा.

४, ९, १६, २५, ___, ४९

(1) ३६ (2) ३०

(3) ४७ (4) ४८

Find the missing number from the given alternatives :

4, 9, 16, 25 ___, 49

(1) 36 (2) 30

(3) 47 (4) 48

---

11. प्रश्नचिन्हाच्या जागी येणारी संख्या कोणती ?

१३, ३२, ६९, १३०, _?_

(1) २२० (2) २२१

(3) २२२ (4) २२३

Find out the number which will come at the question mark :

13, 32, 69, 130, _?_

(1) 220 (2) 221

(3) 222 (4) 223

---

12. गटात न मोडणारी संख्या ओळखा.

१७६, १३२, ८८, ४४, २१

(1) ८८ (2) १७६

(3) ४४ (4) २१

Find the odd man out :

176, 132, 88, 44, 21

(1) 88 (2) 176

(3) 44 (4) 21

---

Truexams.com

13. खालीलपैकी कोणता वर्णाक्षरगट एका सांकेतिक भाषेच्या वर्णाक्षरगटांशी विसंगत आहे ?

CEG, HJL, MNO, PRT

(1) CEG (2) PRT

(3) MNO (4) HJL

Find the group of letters which is not in accordance with the groups of letters of a certain code language.

CEG, HJL, MNO, PRT

(1) CEG (2) PRT

(3) MNO (4) HJL

14. एका सांकेतिक भाषेत POT ह्या शब्दाला 51 हा भारांश दिला जातो तर त्याच सांकेतिक भाषेत STOP ह्या शब्दाला किती भारांश दिला जाईल ?

(1) ७० (2) ७२

(3) ६८ (4) ६६

In a certain code language POT is given weightage as 51. What weightage will be given to STOP in the same code language.

(1) 70 (2) 72

(3) 68 (4) 66

15. खालील मालिकेतील संख्या चढत्या क्रमाने लिहील्यास मध्यावर येणाऱ्या संख्येचा द्वितीय अंक कोणता ?

९१७, ५३१, ६४५, ८१३, ७२४

(1) ४ (2) ३

(3) २ (4) १

If the following figures are arranged in an ascending order, what will be second digit of that figure which comes at the middle of the series ?

917, 531, 645, 813, 724

(1) 4 (2) 3

(3) 2 (4) 1

16. खालील संख्या उतरत्या क्रमाने लिहील्यास शेवटच्या संख्येतील शेवटचा अंक कोणता ?

२२५, ४०६, ३१२, ११७, ५२८

(1) ८ (2) ७

(3) ६ (4) ५

What will be the last digit of the last number if the numbers are arranged in the descending order ?

225, 406, 312, 117, 528

(1) 8 (2) 7

(3) 6 (4) 5

17. खाली दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून मालिका पूर्ण करा.

५८५, ४७४, ३६३, २५२, _?_

(1) १०१ (2) १११

(3) १४१ (4) १२१


Complete the series by using the correct alternative.

585, 474, 363, 252, _?_

(1) 101 (2) 111

(3) 141 (4) 121


18. पुढील आकृतीमध्ये गाळलेला अंक भरा.




(1) २५ (2) ३६

(3) ३५ (4) ३८

Insert the missing number in the following figure.




(1) 25 (2) 36

(3) 35 (4) 38

19. जर +, − , ×, ÷ ह्या चिन्हांच्या अर्थाची अदलाबदल केली आणि जर ११ × ४ = ७ होत असतील तर × ह्या चिन्हाचा अर्थ काय असेल ?

(1) अधिक (2) उणे

(3) गुणीले (4) भागिले

If the meaning of the symbols +, − , ×, ÷ is interchanged and thereby 11 × 4 = 7. What is the meaning of × ?

(1) Addition (2) Subtraction

(3) Multiplication (4) Division



Truexams.com

20. जर Toil म्हणजे १२३४, Salt म्हणजे ५६४१, Soil म्हणजे ५२३४, Stain म्हणजे ५१६३७ तर Station म्हणजे काय ?

(1) ५१६१३२७ (2) ५१६१४२६

(3) ५६६१४२६ (4) ५१६२३२७

If toil is 1234, salt is 5641, soil is 5234, stain is 51637, then what do you mean by station ?

(1) 5161327 (2) 5161426

(3) 5661426 (4) 5162327

---

21. एका वर्गात रामने मोहनपेक्षा जास्त गुण मिळविले. सोहनने मोहनपेक्षा कमी गुण मिळविलेले नाहीत तर सगळ्यात कमी गुण कुणी मिळविले ?

(1) मोहनने (2) सोहनने

(3) रामने (4) कुणी ही नाही

In a class, Ram scored more marks than Mohan. Sohan scored not less than Mohan. Who scored the lowest marks ?

(1) Mohan (2) Sohan

(3) Ram (4) None

---

22. कपिल व चेतन वर्तणुकीत चांगले आहेत. हरी व दिनेश चांगले नाहीत. चेतन व हरी हुशार आहेत. तर या चौघांमध्ये हुशार व चांगला कोण आहे ?

(1) हरी (2) दिनेश

(3) चेतन (4) कपिल

Kapil and Chetan are good in their behaviour. Hari and Dinesh are not good. Chetan and Hari are clever. Who is clever as well as good ?

(1) Hari (2) Dinesh

(3) Chetan (4) Kapil

---

23. एका सांकेतिक भाषेत ENGLISH = GPINKUJ असा लिहीतात तर त्याच भाषेत MARATHI हा शब्द कसा लिहाल ?

In a certain code language ENGLISH is written as GPINKUGJ. How will you write MARATHI in the same language ?

(1) NCSCVJK (2) OCTNCSC

(3) OPSPVSC (4) OCTCVJK

Truexams.com

24. 'जुने ते सोने' यावरून कोणता अर्थबोध होतो ?

(1) जुन्या वस्तु खूप महाग असतात.

(2) जुनी तत्वे कायमस्वरूपी टिकतात

(3) सोने खूप जुने असते

(4) हल्ली वस्तु सोन्याच्या बनवल्या जात नाहित

What is the meaning of 'Old is gold' ?

(1) Old things are very expensive

(2) Old principles remain forever

(3) Gold is very old

(4) Now the things are not made up of gold

---

25. कोणत्या अंकांची अदलाबदल केली तर पुढे दिलेल्या समूहातील सर्वात लहान संख्या ही सर्वात मोठी संख्या होईल ?

२६९, २४५, ३८१, ३६५, ४६८

(1) ५ आणि २ (2) ९ आणि २

(3) ६ आणि २ (4) ४ आणि २

Which digits should be interchanged to convert lowest number of the following group into highest number of the group ?

269, 245, 381, 365, 468

(1) 5 and 2 (2) 9 and 2

(3) 6 and 2 (4) 4 and 2

---

26. जर ZBO, YDQ, XFS, WHU हे समान पध्दतीने रचलेले अक्षरगट आहेत तर V ने सुरु होणाऱ्या गटाचे अंतीम अक्षर कोणते असेल ?

If ZBO, YDQ, XFS, WHU are similarly constructed groups, then the group starting with letter V should end with what letter ?

(1) T (2) U

(3) V (4) W

---

27. एका क्रमणिकेत फक्त पाच संख्या आहेत. क्रमाने येणाऱ्या दोन संख्येतील फरक ६५ आहे. जर सर्वात मोठी संख्या १०३२ असेल तर सर्वात लहान संख्या किती ?

(1) ९६७ (2) ७७२

(3) ९०२ (4) ८३७

There are in all five numbers in the sequence. The difference between each consecutive number is 65. If 1032 is the highest number of the group, then what will be the lowest number ?

(1) 967 (2) 772

(3) 902 (4) 837



Truexams.com

28. संपूर्ण राज्य सनदी सेवा प्रमुख ---------- असतो.

(1) राज्यपाल (2) मुख्यमंत्री

(3) मुख्यसचिव (4) पंतप्रधान

The head of the entire Civil Services of the State is the ______ .

(1) Governor (2) Chief Minister

(3) Chief Secretary (4) Prime Minister

29. कोणाच्या संमतीने राज्यपातळीवर विधेयकाचे कायद्यात रुपांतर होते ?

(1) मुख्यमंत्री (2) विधानसभेचा सभापती

(3) राज्यपाल (4) विधानपरिषदेचे अध्यक्ष

By whose assent do the bills at the State level become laws ?

(1) The Chief Minister

(2) The Speaker of the Legislative Assembly

(3) The Governor

(4) The Chairman of the Legislative Council

30. राज्य वित्त आयोग -------- करिता जबाबदार आहे.

(1) राज्यशासनाच्या वित्तीय प्रशासनाचे नियंत्रण

(2) राज्यशासनाचा वित्तपुरवठा

(3) राज्य शासन व स्थानिक स्वराज्यसंस्था ह्यांच्यातील वित्तीय संबंधाची निश्चिती

(4) औद्योगिक विकासासाठी वित्तपुरवठा

State Finance Commission is responsible for ______

(1) controlling financial administration of the State Govt.

(2) providing finance to the State Govt.

(3) deciding financial relations between the State Govt. and Local bodies.

(4) providing funds for industrial development.

31. विधेयकाचे रूपांतर विधिनियमात होण्यासाठी त्याला किती टप्प्यातून जावे लागते ?

(1) दोन (2) तीन

(3) चार (4) पाच

Through how many stages has the bill to go to become a law ?

(1) Two (2) Three

(3) Four (4) Five

Truexams.com

32. विधानपरिषदेच्या निधिमंडळाचे कायमचे सभागृह मानले जाते. कारण ———

(1) ते एक वरिष्ठ सभागृह आहे.

(2) ते कधीही बरखास्त होत नसते.

(3) त्याचे सभासद कायमचे निवडलेले असतात.

(4) त्याचे सभासद निवडलेले नसतात.

The Legislative Council of a State is known as a Permanent House of Legislature because ————.

(1) it is an Upper House

(2) it never dissolves

(3) its members are permanently elected.

(4) its members are not elected.

33. लोकशाही विकेंद्रीकरण म्हणजे काय ?

(1) कनिष्ठ पातळीवरील शासनाला अधिकार प्रदान करणे.

(2) लोकशाहीच्या तत्त्वांचा शासनाच्या शेवटच्या पातळीपर्यंतचा विस्तार करणे.

(3) लोकशाही केंद्रीकरणाच्या तत्त्वानुसार शासकीय संघटनेची उभारणी करणे.

(4) प्रशासकीय विकेंद्रीकरणाच्या तत्त्वानुसार शासकीय संघटनेची उभारणी करणे.

What is the meaning of Democratic Decentralization ?

(1) Delegation of Authority to the lower levels of Govt.

(2) Expansion of Democratic principles to the lowest level of Govt.

(3) Application of the principle of Democratic centralization to the organization of Govt.

(4) Application of the principle of Administrative decentralization to the organization of Govt.

34. ग्रामपंचायतीच्या सचिव कोण असतो ?

(1) सरपंच

(2) ग्रामसेवक

(3) गट विकास अधिकारी

(4) मुख्य कार्यपालन अधिकारी

Who is the secretary of the Village Panchayat ?

(1) Sarpanch

(2) Gram Sevak

(3) Block Development Officer

(4) Chief Executive Officer

Truexams.com

35. पुढील 'अ' व 'र' ला दोन्ही विधानांचा विचार करून त्यांच्यामधील परस्परसंबंध स्पष्ट करणारा अचूक पर्याय निवडा.

(अ) ग्रामीण स्थानिक संस्थांना संपूर्ण स्वायत्तता देता येत नाही.

(र) त्यांना नियोजनाच्या उद्दिष्टांना अनुरूप रहावे लागते, ती पाळावी लागतात व त्यांचेशी स्थानिक गरजांचा मेल घालावा लागतो.

(1) 'अ' सत्य परंतु 'र' असत्य

(2) 'र' सत्य परंतु 'अ' असत्य

(3) 'अ' व 'र' दोन्ही सत्य परंतु 'र' हे 'अ' चे योग्य कारण नाही.

(4) 'अ' व 'र' दोन्ही सत्य आणि 'र' हे 'अ' चे योग्य कारण आहे.

Consider the statements 'A' and 'R' and find out the correct relationship between them.

(A) The total autonomy to rural local bodies is inconceivable.

(R) They have to conform to and fulfill the plan, objectives and relate them to local needs.

(1) 'A' is true but 'R' is false.

(2) 'R' is true but 'A' is false

(3) 'A' and 'R' both are true but 'R' is not the correct reason of A

(4) 'A' and 'R' both are true and 'R' is the correct answer of 'A'.

36. ब्रिटीश सरकारने गांधीजींना 'कैसर-ए-हिन्द' हा किताब बहाल केला, कारण -------.

(1) गांधीजींनी परदेशी जाऊन आपल्या बुद्धिमत्तेच्या बळावर असाधारण लौकिक मिळविला.

(2) गांधीजींनी लोकजागृतीचे कार्य केले.

(3) पहिल्या जागतिक महायुद्धातील जखमी सैनिकांची गांधीजींनी शुश्रूषा केली.

(4) गांधीजींनी आपल्या सत्याग्रहाच्या शस्त्राने दक्षिण आफ्रिकेत यशस्वी लढा दिला होता.

The British Raj awarded the title 'Kaisar-E-Hind' to Mahatma Gandhi because ______.

(1) Gandhiji achieved extraordinary prestige in the foreign countries due to his intelligence.

(2) Gandhiji did his social work of awakening the people.

(3) Gandhiji served the disabled soldiers in the World War-I.

(4) Gandhiji made his struggle successful in South Africa with his weapon of Satyagraha.

Truexams.com

37. सत्यशोधक समाजाची स्थापना कोणी केली ?
   (1) महात्मा ज्योतिराव फुले
   (2) डॉ. बाबासाहेब आंबेडकर
   (3) गोपाळ कृष्ण गोखले
   (4) राजर्षि छत्रपती शाहू महाराज

   Satyashodhak Samaj was founded by ______.
   (1) Mahatma Jyotirao Phule
   (2) Dr. Babasaheb Ambedkar
   (3) Gopal Krishna Gokhale
   (4) Rajashri Chhatrapati Shahu Maharaj

38. गांधीजींनी नौखाली भागात पदयात्रा काढली कारण –
   (1) शेतकऱ्यांना संगठित करण्यासाठी
   (2) 'भारत छोडो' आंदोलनाच्या कल्पनेचा प्रसार करण्यासाठी
   (3) दंगली शमविण्यासाठी
   (4) क्रांतिकारी युवकांना संगठित करण्यासाठी

   Gandhiji took out a 'Padyatra' in Naukhali because ______
   (1) to unite the farmers.
   (2) to spread the idea of 'Quit India Movement'.
   (3) to put an end to the riots.
   (4) to unite revolutionary youths.

39. 'पुणे करार' करणाऱ्या दोन विभूती
   (1) म. गांधी – महम्मद जिना
   (2) म. गांधी – रॅम्से मॅक्डोनाल्ड
   (3) म. गांधी – डॉ. आंबेडकर
   (4) म. गांधी – सॅम्युएल होअर

   'Pune Pact' was signed between
   (1) Mahatma Gandhi — Mohammad Jinnah
   (2) Mahatma Gandhi — Ramsay Mc Donald
   (3) Mahatma Gandhi — Dr. Ambedkar
   (4) Mahatma Gandhi — Samuel Hoare

Truexams.com

40. इ. स. १८७५ मधील 'दक्खनचे दंगे' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शेतकरी उठावांचे अचूक स्वरूप खालीलपैकी कोणत्या पर्यायातून स्पष्ट होते ?

(1) शेतकऱ्यांचे जमीनदाराविरुद्ध उठाव.

(2) ब्रिटीश वसाहतवादी सत्तेविरुद्ध शेतकऱ्यांचे उठाव.

(3) परकीय मळेमालकांविरुद्ध शेतकऱ्यांचे उठाव.

(4) सावकारां विरुद्ध शेतकऱ्यांचे उठाव.

Which of the following correctly explains the nature of the 'Agricutural riots' known as the 'Deccan riots of 1875' ?

(1) Anti–zamindar peasants revolts

(2) Peasant revolts against British colonial rule

(3) Peasant revolts against foreign planters

(4) Peasant revolts against moneylenders.

41. भारतात वैचारिक जागृती घडवून आणण्यास प्रामुख्याने खालीलपैकी कोणता घटक कारणीभूत ठरला ?

(1) पाश्चात्य शिक्षण (2) इल्बर्ट बील वादंग

(3) भारताचे आर्थिक शोषण (4) शिक्षित मध्यमवर्गाचा उदय

Which of the following factors was mainly responsible for the intellectual awakening in India ?

(1) Western Education (2) Ilbert Bill Controversy

(3) Economic exploitation of India (4) Rise of educated middle class.

42. वल्लभभाई पटेल ह्यांना 'सरदार' ही पदवी बहाल करण्यात आली तो सत्याग्रह म्हणजे –

(1) खेडा सत्याग्रह (2) बार्डोली सत्याग्रह

(3) नागपूर झेंडा सत्याग्रह (4) हैद्राबाद मुक्ती लढा

Vallabhbhai Patel earned the title 'Sardar' in ________.

(1) Kheda Satyagraha (2) Bardoli Satyagraha

(3) Nagpur Flag Satyagraha (4) Hyderabad Liberation Struggle

43. 'चले जाव' आंदोलनकाळात मुंबईत गुप्तपणे कॉंग्रेस रेडिओ चालविणारी व्यक्ती

(1) अरुणा असफ अली (2) अवंतिकाबाई गोखले

(3) उषा मेहता (4) हंसाबेन मेहता

The Congress radio in Mumbai during 'Quit India Movement' was operated by ______

(1) Aruna Asaf Ali (2) Avantikabai Gokhale

(3) Usha Mehta (4) Hansaben Mehta

Truexams.com

44. सर आर्थर क्रॉफर्ड कोण होते ?

(1) मुंबईचे म्युनिसिपल कमिशनर
(2) क्रॉफर्ड मार्केटचे संस्थापक
(3) मुंबईचे गव्हर्नर
(4) भारताचे व्हॉईसरॉय

Who was Sir Arthur Crawford ?

(1) Municipal Commissioner of Mumbai
(2) Founder of Crawford Market
(3) Governor of Mumbai
(4) Viceroy of India

---

45. बाळशास्त्री जांभेकरांनी मराठी भाषेत सुरु केलेल्या वृत्तपत्राचे नाव --------.

(1) प्रभाकर
(2) दर्पण
(3) इंदुप्रकाश
(4) काळ

Balshastri Jambhekar started the newspaper in Marathi named as ______

(1) Prabhakar
(2) Darpan
(3) Induprakash
(4) Kal

---

46. -------- येथे महाराष्ट्रातील प्रमुख पवन ऊर्जा केंद्र आहे.

(1) चोला
(2) खापरखेड़ा
(3) पारस
(4) चाळकेवाडी

________ is the major wind energy centre in Maharashtra.

(1) Chola
(2) Khaparkheda
(3) Paras
(4) Chalkewadi

---

47. कोयना प्रकल्पाचा उद्देश -------- हा होता.

(अ) जलसिंचन
(ब) जलविद्युत निर्मिती
(क) मनोरंजन
(ड) पूरनियंत्रण

(1) 'अ' सत्य आहे.
(2) 'ब' सत्य आहे.
(3) 'अ' आणि 'ब' दोन्ही सत्य आहेत.
(4) सर्व विधाने सत्य आहेत.

The purpose of Koyana project is ________.

(a) Irrigation
(b) Generation of Hydroelectricity
(c) Recreation
(d) Flood control

(1) (a) is true
(2) (b) is true
(3) (a) and (b) both are true
(4) All of the statements are true



Truexams.com

48. पुढील 'अ' व 'र' ह्या दोन्ही विधानांचा विचार करुन त्यांच्यातील परस्पर संबंध स्पष्ट करणारा अचूक पर्याय निवडा.

(अ) मुंबई ही महाराष्ट्राची मोठी बाजारपेठ आहे.

(र) मुंबई हे उत्कृष्ट बंदर आहे.

(1) 'अ' व 'र' ही दोन्ही विधाने बरोबर आहेत व 'र' हे 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.

(2) 'अ' व 'र' ही दोन्ही विधाने बरोबर आहेत परंतु 'र' हे 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

(3) 'अ' हे विधान बरोबर आहे व 'र' चूक आहे.

(4) 'अ' हे विधान चूक आहे व 'र' बरोबर आहे.

Consider the statements 'A' and 'R' and find out the correct relationship between them.

(A) Mumbai is the largest market place in Maharashtra.

(R) Mumbai is an ideal port.

(1) Both 'A' and 'R' are true and 'R' is the correct explanation of 'A'

(2) Both 'A' and 'R' are true but 'R' is not the correct explanation of 'A'

(3) 'A' is true and 'R' is false

(4) 'A' is false and 'R' is true

---

49. महाराष्ट्रात दख्खन पठारावर भूगर्भजलसंपदा अल्प प्रमाणात आहे. कारण त्याची ------- रचना.

(1) सच्छिद्र (2) जोड

(3) झिरपणारी (4) अच्छिद्र

The ground water resources are poor on Deccan trap because of its ______ structure.

(1) Porous (2) Jointed

(3) Permeable (4) Impervious

---

50. गंगा नदीच्या त्रिभुजप्रदेशास सुंदरबन म्हणतात कारण ---------

(1) तो भाग सुंदर आहे.

(2) तेथे सुगंधित वास येतो.

(3) तेथे सुंद्रीची पुष्कळ झाडे आहेत.

(4) तेथे चंदनाची पुष्कळ झाडे आहेत.

The delta of River Ganga is known as Sunderban because ______.

(1) it is beautiful

(2) it has fragrance

(3) Sundri trees are abundant here

(4) Sandle trees are abundant here

---



Truexams.com

51. --------- या दिवशी सूर्यकिरणे भोपाळ शहरावर लंबरूप पडतात.

(1) २१ मार्च (2) २२ सप्टेंबर

(3) २१ डिसेंबर (4) २१ जून

The Sun shines vertically over the city of Bhopal on ______.

(1) $21^{st}$ March (2) $22^{nd}$ September

(3) $21^{st}$ December (4) $21^{st}$ June

---

52. भारतातील खालीलपैकी कोणता भाग पर्जन्यछायेच्या प्रदेशात येतो ?

(1) कोकण किनारपट्टी

(2) महाराष्ट्राचे पठार

(3) तराई प्रदेश

(4) छोटा नागपूरचे पठार

Which of the following regions in India comes under rain shadow area ?

(1) Konkan sea coast

(2) Plateau of Maharashtra

(3) Tarai Region

(4) Plateau of Chhota Nagpur

---

53. भारताची प्रमाणवेळ (IST) ही -------शी संबंधित आहे.

(1) ९०° पू. रेखावृत्त (2) ९०° प. रेखावृत्त

(3) १८०° पू. रेखावृत्त (4) ८१ $\frac{१}{२}$° पू. रेखावृत्त

Indian Standard Time (IST) is related to

(1) 90° E Meridian (2) 90° W Meridian

(3) 180° E Meridian (4) $81\frac{1}{2}$° E Meridian

---

54. दि स्टेट इंडस्ट्रियल अँण्ड इन्व्हेस्टमेण्ट कोर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र (सिकॉम) ची स्थापना ----- वर्षी झाली.

(1) मार्च १९७० (2) मार्च १९६६

(3) एप्रिल १९६७ (4) एप्रिल १९६८

The State Industrial and Investment Corporation of Maharashtra (SICOM) was set up in the year

(1) March 1970 (2) March 1966

(3) April 1967 (4) April 1968

Truexams.com

55. खालीलपैकी कोणती समस्या विशाल उद्योगाची समस्या नाही ?

(1) आधुनिकीकरण

(2) तांत्रिक ज्ञान

(3) वितरण व मूल्य धोरण

(4) अतिरिक्त लोकसंख्या

Which of the following is not a problem for large scale industry ?

(1) Modernisation

(2) Technical knowhow

(3) Policy of distribution and prices

(4) Over population

---

56. औद्योगिक क्रांतीचा भारतावर पुढील परिणाम झाला.

(1) चांगल्या प्रतीच्या वस्तू स्वस्त दरात मिळू लागल्या.

(2) भारताच्या औद्योगिक विकास झाला.

(3) बेरोजगारीच्या प्रश्नाचे निर्मूलन झाले.

(4) भारतातील कुटीरउद्योग व परंपरागत कौशल्याचा लोप झाला.

The result of the Industrial Revolution in India was as follows ———

(1) The articles of good standard were available at low cost.

(2) There was industrial development in India.

(3) Unemployment was eradicated.

(4) The small scale industries in India and the traditional skills were destroyed.

---

57. कारखाना स्थापन करण्यात खालीलपैकी कोणता एक घटक प्रमुख भूमिका बजावतो ?

(1) दळणवळण (2) कच्चामाल

(3) सरकारी धोरण (4) कामगार उपलब्धता

To establish any industry, which one of the following factors plays a major role ?

(1) Communication (2) Raw material

(3) Government Policy (4) Availability of workers

Truexams.com

58. खालील 'अ' व 'र' विधाने विचारात घेऊन त्यामधील परस्पर संबंध स्पष्ट करणारा अचूक पर्याय निवडा.

(अ) लघुउद्योगांचा विकास ग्रामीण भारताची पुनर्बांधणी करेल.

(र) लघुउद्योग रोजगाराच्या संधी उपलब्ध करतात.

(1) 'अ' व 'र' ही दोन्ही विधाने बरोबर आहेत व 'र' हे 'अ' चे अचूक कारण आहे.

(2) 'अ' व 'र' ही दोन्ही विधाने बरोबर आहेत परंतु 'र' हे 'अ' चे अचूक कारण नाही.

(3) 'अ' हे विधान बरोबर आहे व 'र' चूक आहे.

(4) 'अ' हे विधान चूक आहे व 'र' बरोबर आहे.

Consider the statements 'A' and 'R' and choose the alternative that gives the correct relationship between them.

(A) The development of small scale industries will rebuild the rural India.

(R) Small scale industries provide job opportunities.

(1) Both 'A' and 'R' are true and 'R' is the correct reason for 'A'.

(2) Both 'A' and 'R' are true but 'R' is not the correct reason for 'A'.

(3) 'A' is true and 'R' is false.

(4) 'A' is false and 'R' is true.

59. महाराष्ट्रात काही ग्रामीण आदिवासी स्त्रियांनी इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या सुट्या भागाचे उत्पादन -------- येथे सुरु केले आहे.

(1) आळंदी (2) इंदापूर

(3) राजगुरुनगर (4) सोलापूर

In Maharashtra, some rural Adivasi women have started production of electronic spare parts at ______________.

(1) Aalandi (2) Indapur

(3) Rajgurunagar (4) Solapur

60. भारतातील हस्तउद्योगाचे ऱ्हास खालील कारणामुळे होत आहे.

(1) विशिष्टीकरणाची सुरुवात.

(2) व्यक्तिकरणाची वाढ.

(3) कामगार सहजपणे उपलब्ध झाला.

(4) उत्पादनाची कारखाना पद्धती सुरु केली.

Indian Handicrafts Business is collapsing because of the following reason :

(1) Emergence of specialization

(2) Individualization increased

(3) Labour was easily available

(4) Introduction of factory system of production

Truexams.com

61. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून शासनाने औद्योगीकरणावर लक्ष केंद्रित करण्याचा प्रमुख हेतू -------- होता.

(1) बेरोजगारी कमी करणे

(2) दरडोई उत्पन्न वाढविणे

(3) राहणीमानाचा दर्जा वाढविणे

(4) उच्चशिक्षणाला प्रोत्साहनदेणे

From Second Five Year Plan, Govt. had concentrated attention on industrialization because ________.

(1) to reduce unemployment

(2) to increase per capita income

(3) to increase standard of living

(4) to promote higher education

---

62. 'ऑफिस हिन्दी' हे सॉफ्टवेयर ---------- ह्यांची निर्मिती आहे.

(1) सी-डॅक
(2) मायक्रोसॉफ्ट
(3) इन्फोसिस
(4) एन. आय. सी.

'Office Hindi' software is launched by

(1) C-DAC
(2) Microsoft
(3) Infosys
(4) NIC

---

63. जर एखादा पदार्थ समुद्रसपाटीवरून विषुववृत्तापासून ध्रुवाकडे नेला तर त्याचे वजन -------

(1) कमी होत जाईल

(2) वाढत जाईल

(3) उन्हाळ्यात वाढेल व हिवाळ्यात कमी होईल

(4) वजनात फरक होणार नाही

If a body is moved from equator to the pole on mean sea level, its weight ________.

(1) will decrease

(2) will increase

(3) will increase in summer and decrease in winter

(4) will remain the same

---

64. स्टेनलेस स्टीलचा -------- हा एक घटक आहे.

(1) ॲल्युमिनियम
(2) क्रोमियम
(3) मॅग्नेशियम
(4) टीन (कथिल)

Stainless steel contains ________.

(1) Aluminium
(2) Chromium
(3) Magnesium
(4) Tin

65. वादळात वीजेचा प्रकाश आधी दिसतो व नंतर गडगडाट ऐकू येतो, कारण ------
(1) प्रकाश ध्वनी आधी निर्माण होतो.
(2) प्रकाश ध्वनीपेक्षा अधिक वेगाने जातो.
(3) मानवाचा डोळा कर्णेंद्रियापेक्षा अधिक संवेदनशील असतो.
(4) वरीलपैकी कोणतेही नाही.
During thunder, we see the light first and then hear the sound. The reason is ______.
(1) Light is produced before sound is produced
(2) Light travels faster than sound
(3) Human eye is more sensitive than ear.
(4) None of the above

66. डॅनियलच्या विद्युतघटात -------- हे विध्रुवक म्हणून वापरतात.
(1) $MnO_2$ (2) $CuSO_4$
(3) $NH_4Cl$ (4) $H_2SO_4$
In Daniel cell ______ is used as a depolarizer.
(1) $MnO_2$ (2) $CuSO_4$
(3) $NH_4Cl$ (4) $H_2SO_4$

67. गीझरमधील तारेच्या काटछेदाचा व्यास दुप्पट केला असता पाण्याचे तपमान ------
(1) लवकर वाढेल (2) जास्तवेळाने वाढेल
(3) काही परिणाम होणार नाही (4) खाली येईल
If the diameter of the cross-section of heating coil in the geyser is doubled, then the temperature of water will ______.
(1) rise in short time (2) take longer time to rise
(3) have no effect (4) come down

68. एका सजीवाला लाभ मिळत असेल व दुसऱ्या सजीवाची हानी होत असेल तर अशा सहयोगी जीवनपद्धतीस --- म्हणतात.
(1) सहजीवन (2) परजीवन
(3) मृतोपजीवन (4) सहभोजन
An association of two organisms in which one of the partners is benefitted while other is harmed, is known as _____.
(1) Symbiosis (2) Parasitism
(3) Saprophytism (4) Commensalism

Truexams.com

69. जमीनीलगत पातळीवर $CO_2$ चे वातावरणातील प्रमाण रात्रीपेक्षा दिवसा -------- असते.

(1) जास्त (2) कमी

(3) समान (4) निश्चितसांगता येत नाही

At the ground level, the proportion of $CO_2$ in air is ______ during day time than at night time.

(1) more (2) less

(3) same (4) can't say

70. महाराष्ट्रात जैवतंत्रज्ञान दिवस -------- रोजी पाळण्यात येतो.

(1) २८ फेब्रुवारी (2) ५ जून

(3) १४ नोव्हेंबर (4) ११ जुलै

In Maharashtra, Biotechnology Day is observed on ______.

(1) 28 February (2) 5 June

(3) 14 November (4) 11 July

71. 'एमयूटीपी' हा प्रकल्प मुंबईत प्रामुख्याने --------- यासाठी राबविला जाणार आहे.

(1) पेट्रोलबचत (2) नागरीपरिवहन

(3) झोपडपट्टीसुधार (4) ग्राहकसंरक्षण

'MUTP' project will be mainly implemented in Mumbai for ______.

(1) conservation of petrol (2) urban transportation

(3) slum improvement (4) consumer protection

72. 'महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश २००२' ह्याच्या कार्यकक्षेत खालीलपैकी कोणाचा समावेश नाही ?

(1) महाराष्ट्र लोकसेवा आयोग (2) शासकीय कार्यालये

(3) न्यायालये (4) सहकारी सोसायट्या

Which of the following does not come under the jurisdiction of "Maharashtra Right to Information Ordinance 2002" ?

(1) Maharashtra Public Service Commission

(2) Govt. Offices

(3) Courts

(4) Co-operative Societies



Truexams.com

73. सन् २००३ मध्ये 'महाराष्ट्र भूषण' ------- ह्यांना जाहीर झाला.
(1) कै. डॉ. नीतू मांडके (2) लता मंगेशकर
(3) डॉ. अभय बंग व डॉ. राणी बंग (4) पंडित भीमसेन जोशी

In 2003, the award of 'Maharashtra Bhushan' was declared to ______.
(1) Late Dr. Neetu Mandke
(2) Lata Mangeshkar
(3) Dr. Abhay Bang and Dr. Rani Bang
(4) Pandit Bhimsen Joshi

---

74. 'पु. ल. देशपांडे कला अकादमी' ------- येथे आहे.
(1) मुंबई (2) पुणे
(3) रत्नागिरी (4) दिल्ली

'P. L. Deshpande Kala Academy' is located at ______.
(1) Mumbai (2) Pune
(3) Ratnagiri (4) Delhi

---

75. भारतात भुयारी (मेट्रो) रेल्वे प्रथम ------ येथे सुरु झाली.
(1) दिल्ली (2) कोलकाता
(3) चेन्नई (4) मुंबई

In India, Metro railway was first started in ______.
(1) Delhi (2) Kolkata
(3) Chennai (4) Mumbai

---

76. ओपेक (OPEC) मध्ये खालीलपैकी कोणाचा समावेश नाही ?
(1) रशिया (2) कुवेत
(3) अल्जिरिया (4) व्हेनेझुएला

Which of the following is not included in OPEC ?
(1) Russia (2) Kuwait
(3) Algeria (4) Venezuela

---

77. भारतातील पहिले 'मयूर अभयारण्य' -------- येथे आहे.
(1) महाराष्ट्र (2) राजस्थान
(3) गुजरात (4) मध्यप्रदेश

The first ' Peacock Sanctuary' of India is situated in ______
(1) Maharashtra (2) Rajasthan
(3) Gujarat (4) Madhya Pradesh





Truexams.com

78. एका सांकेतिक भाषेतील वर्णाक्षरांचा क्रम पुढीलप्रमाणे आहे –
EV FU GT HS तर पुढील वर्णाक्षरांची जोडी कोणती राहील ?

The alphabets of a certain code language are in the following order :
EV FU GT HS. What will be the next pair of letters in the same code language ?

(1) JW (2) MT
(3) IR (4) KS

---

79. गटात न बसणारी संख्या ओळखा.

८, १६, ४८, १९१, ९६०

(1) १९१ (2) ९६०
(3) ४८ (4) १६

Find the odd man out :

8, 16, 48, 191, 960

(1) 191 (2) 960
(3) 48 (4) 16

---

80. रिकाम्या जागी योग्य अंक लिहून मालिका सुसंगत बनवा.

१५४३, २४२५, १२५ — , ५१४३

(1) ४ (2) ५
(3) ६ (4) ३

Complete the series by writing appropriate digit in the blank space.

1543, 2425, 125 — , 5143

(1) 4 (2) 5
(3) 6 (4) 3

---

81. घोडा बैलापेक्षा अधिक गतीने पळतो परंतु त्याला वाघा एवढी गती नाही. वाघ हा हरिणापेक्षा अधिक गतीने पळतो परंतु त्याला चित्त्याएवढी गती नाही. तर खालीलपैकी कोणाची पळण्याची गती सर्वात अधिक आहे.

(1) वाघ (2) चित्ता
(3) हरिण (4) घोडा

A horse runs faster than an Ox but not so fast as Tiger. Tiger runs faster than a Deer but not as fast as a Panther. Then who among the following is the fastest runner ?

(1) Tiger (2) Panther
(3) Deer (4) Horse



Truexams.com

82. ऑप्टोनिका टी.व्ही. ची किंमत बी.पी.एल. टी.व्हीं च्या तीनपट आहे. बी.पी.एल. टी.व्ही. ची किंमत ओनिडा टी.व्ही. च्या दुप्पट आहे.

तीन्ही दूरदर्शन संचाच्या (टी.व्ही.) किंमती ची सरासरी ६,००० रुपये आहे. तर ऑप्टोनिका टी.व्हीं. ची किंमत किती आहे ?

(1) रु. १५,०००  (2) रु. १२,०००

(3) रु. १०,०००  (4) रु. ८,०००

Optonica TV's price is thrice to that of BPL and BPL's price is twice to that of Onida. Average price of three TV sets is Rs. 6,000. What is the price of Optonica TV ?

(1) Rs. 15,000  (2) Rs. 12,000

(3) Rs. 10,000  (4) Rs. 8,000

---

83. संजय विजयपेक्षा २ वर्षांनी लहान पण अजयपेक्षा ३ वर्षांनी मोठा आहे. त्या तिघांच्या वयाची बेरीज १४ वर्षे आहे. तर विजयचे वय किती ?

(1) ५ वर्षे  (2) ७ वर्षे

(3) ११ वर्षे  (4) १२ वर्षे

Sanjay is two years younger than Vijay but three years elder than Ajay. The total of their ages is 14 years. What is the age of Vijay ?

(1) 5 years  (2) 7 years

(3) 11 years  (4) 12 years

---

84. एका सांकेतिक भाषेत FHNPCE ला GOD असे लिहीतात तर त्याच सांकेतिक भाषेत ACDFCE कसे लिहाल ?

In a certain code language FHNPCE is written as GOD. How will you write ACDFCE in the same code language ?

(1) ROD  (2) BAD

(3) DOT  (4) BED

---

85. मालिकेचा तिसरा घटक शोधा.

१८७, २५५, ------, ४५९

(1) २८९  (2) ३२३

(3) ३५७  (4) ३९१

Find out the third member of the series :

187, 255, ———, 459

(1) 289  (2) 323


(3) 357  (4) 391

---



Truexams.com


86. खालील आकृतीचे निरीक्षण करा व फुटबॉल आणि हॉकी खेळणाऱ्या क्रिकेटपटूंची संख्या सांगा.




(1) ५ (2) ७

(3) ९ (4) ३

Study the following diagram and identify the number of cricket players who also play football and hockey.




(1) 5 (2) 7

(3) 9 (4) 3

87. मी एका रांगेत उभा आहे. माझा क्रमांक दोन्ही टोकांकडून सहावा येतो. तर रांगेत किती व्यक्ती उभ्या आहेत ?

(1) १२ (2) ११

(3) १५ (4) ९

I am standing in a queue. My number is $6^{th}$ from both the ends. How many persons are standing in the queue ?

(1) 12 (2) 11

(3) 15 (4) 9

88. एका सांकेतिक भाषेत STRONG हा शब्द TSORGN असा लिहीला जातो तर त्याच भाषेत BEAUTY हा शब्द कसा लिहाल ?

In a certain code language STRONG is written as TSORGN, then how will you write BEAUTY in the same language ?

(1) UTYBEA (2) UYTAEB

(3) EYTAEB (4) EBUAYT



Truexams.com

89. मनिषा, निलेश आणि सुधापेक्षा बुटकी आहे. वीणा, सुधा आणि मनिषापेक्षा उंच आहे. ज्योती, वीणा आणि निलेशपेक्षा उंच आहे. तर सर्वात बुटके कोण आहे ?

(1) निलेश (2) सुधा

(3) मनिषा (4) वीणा

Manisha is shorter than Nilesh and Sudha. Veena is taller than Sudha and Manisha. Jyoti is taller than Veena and Nilesh. Who is the shortest of all ?

(1) Nilesh (2) Sudha

(3) Manisha (4) Veena

---

90. पुढील संख्या जर चढत्या क्रमाने लावल्या तर त्यापैकी मधल्या संख्येचा मधला अंक कोणता ?

५८७, ४७६, ३८९, ८५६, ४६७

(1) ६ (2) ७

(3) ८ (4) ९

What will be the middle digit of the middle number, if the following numbers are arranged in an ascending order ?

587, 476, 389, 856, 467

(1) 6 (2) 7

(3) 8 (4) 9

---

91. जर ३ + २ = ६, १६ ÷ २ = १४, ७ – ३ = २१ तर २७ ÷ ९ ?

(1) ३ (2) ३६

(3) १८ (4) २४३

If 3 + 2 = 6, 16 ÷ 2 = 14, 7 – 3 = 21, what would be 27 ÷ 9 ?

(1) 3 (2) 36

(3) 18 (4) 243

---

92. पुढील गटातील वेगळा घटक ओळखा.

७७, १२१, १५४, १६६

(1) ७७ (2) १२१

(3) १५४ (4) १६६

Find the odd man out :

77, 121, 154, 166

(1) 77 (2) 121

(3) 154 (4) 166

---



Truexams.com

93. २३०१ ते २३३० या दरम्यान येणाऱ्या सर्व संख्यांमध्ये ३ हा अंक एकूण किती वेळा येईल ?

(1) ३०　　(2) ३४

(3) ३१　　(4) ३३

How many times does the digit 3 occurs between 2301 and 2330 ?

(1) 30　　(2) 34

(3) 31　　(4) 33

94. 'तो जरूर मदत करेल कारण तो एक चांगला मित्र आहे'. या विधानावरून खालील चारां पैकी कोणता निष्कर्ष काढता येईल ?

(1) जे मदत करतात ते मित्र असतात.

(2) जे मित्र नसतात ते मदत करीत नाहीत.

(3) जो मदत करु शकतो तो मित्र नाही.

(4) सर्व चांगले मित्र मदत करतात.

"He will surely help because he is a good friend." In connection with this sentence, which of the following statements is most appropriate ?

(1) Those who help are friends

(2) Those who are not friends, do not help

(3) Those who can help are not friends

(4) All good friends help

95. खालीलपैकी कोणत्या संख्येस ३ ने नि:शेष भाग जातो ?

(1) ३१७　　(2) २०८

(3) १०८　　(4) ९८

Which of the following numbers is divisible by 3 ?

(1) 317　　(2) 208

(3) 108　　(4) 98

96. एक पाल ३.६ मीटर उंच भिंतीवर चढते आहे. दर मिनीटाला ती १५ सें.मी. वर चढते व पुढच्या मिनीटाला ५ सें.मी. खाली उतरते. तर याच गतीने भिंतीच्या वरच्या टोकाशी पोहचण्यास तीला किती वेळ लागेल ?

(1) ३६ मिनीटे　　(2) २४ मिनीटे

(3) ७२ मिनीटे　　(4) ४८ मिनीटे

A wall lizard is climbing over a 3.6 metre high wall. Every minute it climbs 15 cms and comes down 5 cms by the next minute. How much time it will take to reach at the top of the wall ?


(1) 36 minutes　　(2) 24 minutes



(3) 72 minutes　　(4) 48 minutes


Truexams.com

97. मालिकेचा तिसरा घटक शोधा.

Find out the third member of the series :



(1)  (2) 

(3)  (4) 

98. अ, ब आणि क ह्या तीन्ही भावांच्या वयांची बेरीज आज ४० वर्षे आहे. आजपासून ५ वर्षानंतर त्यांच्या वयाची बेरीज किती वर्षे होईल ?

(1) ५५ वर्षे (2) ४८ वर्षे

(3) ४५ वर्षे (4) ४३ वर्षे

Today the sum of ages of three brothers A, B and C is 40 years. What will be the sum of their ages after 5 years from today ?

(1) 55 years (2) 48 years

(3) 45 years (4) 43 years

99. एका सांकेतिक भाषेत ORIGINAL हा शब्द ORNIGIAL असा लिहीतात तर त्याच भाषेत QUESTION हा शब्द कसा लिहाल ?

In a certain code language ORIGINAL is written as ORNIGIAL. How will you write QUESTION in the same language ?

(1) QUITSEON (2) QUITESON

(3) QUSETION (4) QUTISEON

100. एका विवाहित जोडप्यास (पती-पत्नी) दोन विवाहित मुलगे असून त्यांना प्रत्येकी तीन मुले आहेत तर त्या कुटंबातील व्यक्तींची एकूण संख्या किती ?

(1) ७ (2) १२

(3) ११ (4) ९

A married couple (husband and wife) had two married sons and each of them had three children. How many members are there in the family ?

(1) 7 (2) 12

(3) 11 (4) 9

Truexams.com

**परीक्षेचे नांव :** सहायक मोटार वाहन निरीक्षक पूर्व परीक्षा - २०२०

**विषय :** सामान्य क्षमता चाचणी **परीक्षेचा दिनांक :** १५ मार्च, २०२०

**जा.क्र.:-** ०२/२०२०.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **" सहायक मोटार वाहन निरीक्षक पूर्व परीक्षा-२०२०"** या स्पर्धा परीक्षेच्या प्रश्नपुस्तिकेची प्रथम उत्तरतालिका उमेदवारांच्या माहितीसाठी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. त्यासंदर्भात उमेदवारांनी अधिप्रमाणित (Authentic) स्पष्टीकरण / संदर्भ देऊन पाठविलेली लेखी निवेदने, तसेच तज्ज्ञांचे अभिप्राय विचारात घेऊन, आयोगाने उत्तरतालिका सुधारित केली आहे. या उत्तरतालिकेतील उत्तरे अंतिम समजण्यात येतील. यासंदर्भात आलेली निवेदने विचारात घेतली जाणार नाहीत व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

## उत्तरतालिका - KEY

| प्रश्न क्रमांक | उत्तरे | | | |
|---|---|---|---|---|
| | संच A | संच B | संच C | संच D |
| 1 | 4 | 3 | 4 | 2 |
| 2 | 1 | 2 | 4 | 3 |
| 3 | 4 | 3 | 3 | 2 |
| 4 | 3 | 3 | 2 | 3 |
| 5 | 4 | 4 | 4 | 4 |
| 6 | 1 | 3 | 3 | 1 |
| 7 | 3 | 3 | 1 | 1 |
| 8 | 2 | 3 | # | 1 |
| 9 | 3 | 2 | 2 | 2 |
| 10 | 2 | # | 1 | 3 |
| 11 | 3 | 3 | 3 | 1 |
| 12 | 3 | 1 | 4 | 2 |
| 13 | 4 | 2 | 3 | 3 |
| 14 | 3 | 2 | 1 | 2 |
| 15 | 3 | 4 | 4 | 1 |
| 16 | 3 | 1 | 4 | 1 |
| 17 | 2 | 2 | 2 | 4 |
| 18 | # | 4 | 1 | 1 |
| 19 | 3 | 4 | 4 | 2 |
| 20 | 1 | 3 | 3 | 1 |
| 21 | 2 | 2 | 3 | 1 |
| 22 | 2 | 4 | 4 | 3 |
| 23 | 4 | 3 | 4 | 2 |
| 24 | 1 | 1 | 3 | 1 |
| 25 | 2 | # | 3 | 3 |

| प्रश्न क्रमांक | उत्तरे | | | |
|---|---|---|---|---|
| | संच A | संच B | संच C | संच D |
| 26 | 4 | 2 | 3 | 4 |
| 27 | 4 | 1 | # | 3 |
| 28 | 3 | 3 | 4 | 4 |
| 29 | 2 | 4 | 2 | 3 |
| 30 | 4 | 3 | 3 | 2 |
| 31 | 3 | 1 | 2 | 1 |
| 32 | 1 | 4 | 1 | 1 |
| 33 | # | 4 | 1 | 2 |
| 34 | 2 | 2 | 1 | 3 |
| 35 | 1 | 1 | 4 | 1 |
| 36 | 3 | 4 | 2 | 2 |
| 37 | 4 | 3 | 2 | 3 |
| 38 | 3 | 3 | 4 | 4 |
| 39 | 1 | 4 | 2 | 1 |
| 40 | 4 | 4 | 3 | 4 |
| 41 | 4 | 3 | 2 | 3 |
| 42 | 2 | 3 | 3 | 4 |
| 43 | 1 | 3 | 4 | 1 |
| 44 | 4 | # | 1 | 3 |
| 45 | 3 | 4 | 1 | 2 |
| 46 | 3 | 2 | 1 | 3 |
| 47 | 4 | 3 | 2 | 2 |
| 48 | 4 | 2 | 3 | 3 |
| 49 | 3 | 1 | 1 | 3 |
| 50 | 3 | 1 | 2 | 4 |

Truexams.com

Date: 15th September, 2020

**# ने दर्शविलेले प्रश्न रद्द करण्यात आलेले आहेत.**

| प्रश्न क्रमांक | उत्तरे | | | |
|---|---|---|---|---|
| | संच A | संच B | संच C | संच D |
| 51 | 3 | 1 | 3 | 3 |
| 52 | # | 4 | 2 | 3 |
| 53 | 4 | 2 | 1 | 3 |
| 54 | 2 | 2 | 1 | 2 |
| 55 | 3 | 4 | 4 | # |
| 56 | 2 | 2 | 1 | 3 |
| 57 | 1 | 3 | 2 | 1 |
| 58 | 1 | 2 | 1 | 2 |
| 59 | 1 | 3 | 1 | 2 |
| 60 | 4 | 4 | 3 | 4 |
| 61 | 2 | 1 | 2 | 1 |
| 62 | 2 | 1 | 1 | 2 |
| 63 | 4 | 1 | 3 | 4 |
| 64 | 2 | 2 | 4 | 4 |
| 65 | 3 | 3 | 3 | 3 |
| 66 | 2 | 1 | 4 | 2 |
| 67 | 3 | 2 | 3 | 4 |
| 68 | 4 | 3 | 2 | 3 |
| 69 | 1 | 2 | 1 | 1 |
| 70 | 1 | 1 | 1 | # |
| 71 | 1 | 1 | 2 | 2 |
| 72 | 2 | 4 | 3 | 1 |
| 73 | 3 | 1 | 1 | 3 |
| 74 | 1 | 2 | 2 | 4 |
| 75 | 2 | 1 | 3 | 3 |

| प्रश्न क्रमांक | उत्तरे | | | |
|---|---|---|---|---|
| | संच A | संच B | संच C | संच D |
| 76 | 3 | 1 | 4 | 1 |
| 77 | 2 | 3 | 1 | 4 |
| 78 | 1 | 2 | 4 | 4 |
| 79 | 1 | 1 | 3 | 2 |
| 80 | 4 | 3 | 4 | 1 |
| 81 | 1 | 4 | 1 | 4 |
| 82 | 2 | 3 | 3 | 3 |
| 83 | 1 | 4 | 2 | 3 |
| 84 | 1 | 3 | 3 | 4 |
| 85 | 3 | 2 | 2 | 4 |
| 86 | 2 | 1 | 3 | 3 |
| 87 | 1 | 1 | 3 | 3 |
| 88 | 3 | 2 | 4 | 3 |
| 89 | 4 | 3 | 3 | # |
| 90 | 3 | 1 | 3 | 4 |
| 91 | 4 | 2 | 3 | 2 |
| 92 | 3 | 3 | 2 | 3 |
| 93 | 2 | 4 | # | 2 |
| 94 | 1 | 1 | 3 | 1 |
| 95 | 1 | 4 | 1 | 1 |
| 96 | 2 | 3 | 2 | 1 |
| 97 | 3 | 4 | 2 | 4 |
| 98 | 1 | 1 | 4 | 2 |
| 99 | 2 | 3 | 1 | 2 |
| 100 | 3 | 2 | 2 | 4 |

Date: 15th September, 2020



# ने दर्शविलेले प्रश्न रद्द करण्यात आलेले आहेत.

Truexams.com